Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

# नाटयीकरण पद्धतीः सर्वेक्षणात्मक अभ्यास

**प्रा. डॉ. पी. ओ. चौधरी,**
**आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर,**
**जि. धुळे. महाराष्ट्र**

***सारांश -***

***प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा नाटयीकरण पद्धतीविषयी मतांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. सहेतूक नमुना निवड पद्धतीने माध्यमिक शाळेतील ४० स्त्री शिक्षक व ५० पुरूष शिक्षक असे एकूण ९० शिक्षकांची निवड न्यादर्श म्हणून केली. माहिती संकलित करण्यासाठी संशोधकाने स्व निर्मित शोधिका तयार केली होती. त्यात एकुण नाटयीकरण पद्धतीविषयी १२ विधाने तयार करण्यात आली असून सहमत, असहमत व सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते. माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी 'टक्केवरी' या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे. संशोधनाच्यानिष्कर्षात माध्यमिक शाळेतील अधिकेतर शिक्षक हे नाटयीकरण पद्धतीच्या वापराबाबत सहमती दर्शवितांना दिसून येतात.***

**प्रस्तावना-**

अध्ययन-अध्यापनातील उणिवा भरून काढण्यासाठी अनेक पद्धती आणि तंत्रविज्ञाची मदत घेतली जात असते. पारंपारिक पद्धतीपासून तर आजच्या तंत्रविज्ञानाच्या साहाय्याने केले जाणारे अध्यापन यामुळे अध्ययन आणि अध्यापनातील प्रक्रियेतही बदल झालेला आपण पाहत आहोत. अध्यापनाची ठरवलेली उद्दिष्टांनूसार शिक्षक आशयावर जी प्रक्रिया करतो आणि तो आशय सहज आणि सोप्या भाषेत विद्यार्थ्यापर्यंत पोहचवितो यालाच अधिक महत्त्व असते. व्याख्यान पद्धती, कथनपद्धती, सांघिक अध्यापन पद्धती, समस्या निराकरण पद्धती, उद्गामी व अवगामी अध्यापन पद्धती, दिग्दर्शनपद्धती अशा सर्वच अध्यापन पद्धतीचे अध्ययन आणि अध्यापनात आपले स्वतःचे एक वैशिष्टे मानले जाते. प्रत्येकाची वैयक्तिक परिणामकारकता ही आशयावर अवलंबून असते. शिक्षक वर्गात प्रत्येक अध्यापन पद्धती वापरत असेलच असे नाही. अभ्यासक्रम वेळेवर पूर्ण करणे यावर जर अधिक भर राहिला तर मग केवळ पारंपारिक पद्धतीचा उपयोग केला जात असतो. परंतु विद्यार्थ्यांना काही आशय भाग हा प्रभावीपणे शिकवायचा असला तर त्यावेळेस वरील अध्यापन पद्धती खास आहेतच परंतु आणखी एक महत्त्वपूर्ण अध्यापन पद्धती आहे ती म्हणजे नाटयीकरण पद्धती.

ऐतिहासिक कथा किंवा कल्पित कथा जेव्हा काही संवादांच्या साहाय्याने रंगमंचावर सादर केली जाते आणि प्रेक्षकांच्या मनामध्ये यशानुकूल भाव उत्पन्न करते व ज्यामुळे आपले मनोरंजनही होते त्या कृतीला नाटक असे म्हणतात. हेच नाटक काही विशिष्ट उद्देश डोळयापुढे ठेवून व त्याला शैक्षणिक आशय देवून वर्गात सादर करणे म्हणजे अध्यापनाची नाटयीकरण पद्धती होय. (बरकले आणि पिचड, २०१२, पृ. ०३) विद्यार्थ्याचा सर्वांगीण अध्ययनाचा हेतू सफल होण्यासाठी शिक्षकाना आशयानूरूप अध्यापनासाठी ही एक महत्त्वाची पद्धती आहे. यातुन विद्यार्थ्यांचा श्रवण, भाषण, अभिव्यक्ती, विचारकरण्याची क्षमता, स्वःजाणीव, गटात एकमेकांनी सहकार्याची भावना, सामाजिक बुध्यांक अशा विविध पैलुंचा विकास या पद्धतीच्या अवलंबनातून होत असतो.

Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

शिक्षणाचा माध्यमिक स्तर हा कालावधी सत्य शिवंम् सुंदरम ही जीवनाची अंतिम मूल्य आत्मसात करण्यासाठी स्वतः ला तयार करीत असतो, नाटयीकरणातून ही मूल्य विद्यार्थ्यांना सहज आत्मसात करता येवू शकतील हे वैशिष्टे या पद्धतीचे आहे. म्हणूनच नाटयीकरण पद्धतीविषयी माध्यमिक शाळेतील शिक्षकांची काय मते आहेत हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य करण्यात आले आहे.

**समस्या विधान-**

नाटयीकरण पद्धतीचा सर्वेक्षणात्मक अभ्यास करणे.

**उद्दिष्ट -**

माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा नाटयीकरण पद्धतीविषयी मतांचा अभ्यास करणे.

**पध्दती-**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा नाटयीकरण पद्धतीविषयी असलेल्या मतांचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या व न्यादर्श-**

प्रस्तुत संशोधनातील शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेत अध्यापन करणारे सर्व स्त्री व पुरुष हे संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चित केले होते. सहेतूक नमुना निवड पद्धतीने माध्यमिक शाळेतील ४० स्त्री शिक्षक व ५० पुरूष शिक्षक असे एकूण ९० शिक्षकांची निवड प्रस्तुत संशोधनासाठी केली.

**संशोधन साधने-**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माध्यमिक शाळेतील शिक्षकांची नाटयीकरण पद्धती वापराविषयी मते जाणून घ्यावयाची असल्याने माहिती संकलित करण्यासाठी संशोधकाने स्व निर्मित शोधिका तयार केली होती. त्यात एकुण नाटयीकरण पद्धतीविषयी १२ विधाने तयार करण्यात आली असून सहमत, असहमत व सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते.

**संख्याशास्त्रीय परिमाणे-**

प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी टक्केवरी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.


**माहिती विश्लेषण व अन्वयार्थ -**

प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावल्यानंतर त्याचे तक्ता स्वरूपात मांडणी करण्यात आली. त्यावरून निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत.

**०१. नाटयीकरण हे नेहमी वापरण्याची दैनंदिन अध्यापनाची पद्धती नाही.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ७१ | ११ | ०८ |
| ७९% | १२% | ०९% |


**निष्कर्षः** नाटयीकरण ही नेहमी वापरण्याची दैनंदिन पद्धती नाही. यासाठी ७९% शिक्षकांनी सहमत, १२% शिक्षकांनी असहमत तर ०९% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे.
यावरून असे सांगता येईल की, अधिकतर शिक्षकांच्यामते, नाटयीकरण ही दैनंदिन अध्यापनाची पद्धती नाही.




**०२. नाटयीकरण ही वेळखाऊ व खर्चिक अध्यापनाची पद्धती आहे.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ७६ | ०७ | ०७ |
| ८४% | ०८% | ०८% |


**निष्कर्षः** नाटयीकरण ही वेळखाऊ व खर्चिक अध्यापनाची पद्धती आहे. यासाठी ८४% शिक्षकांनी सहमत, ०८% शिक्षकांनी असहमत तर ०८% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे.
यावरून असे सांगता येईल की, अधिकतर शिक्षकांच्यामते, नाटयीकरण ही वेळखाऊ व खर्चिक अध्यापनाची पद्धती आहे.




**०३. नाटयीकरण पद्धतीचा प्रभावी उपयोजनासाठी शिक्षक प्रशिक्षण कार्यातील सूक्ष्म अध्यापनातच तयारी करून घेतली पाहिजे.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ६७ | १५ | ०८ |
| ७४% | १७% | ०९% |

**निष्कर्षः** नाटयीकरण पद्धतीची तयारी सूक्ष्म अध्यापनातच झाली पाहिजे यासाठी ७४% शिक्षकांनी सहमत, १७% शिक्षकांनी असहमत तर ०९% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे.
यावरून असे सांगता येईल की, अधिकतर शिक्षकांच्यामते, नाटयीकरण पद्धतीच्या प्रभावासाठी त्याची तयारी सूक्ष्म अध्यापनातच करून घेतली पाहिजे.




Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

**०४. नाटयीकरण पद्धतीच्या उपयोजनामुळे विद्यार्थ्यांची साहित्य अभिरूची विकसित होण्यास मदत होते.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ७३ | ०५ | १२ |
| ८१% | ०६% | १३% |

**निष्कर्ष:** नाटयीकरण पद्धतीच्या उपयोजनामुळे विद्यार्थ्यांची साहित्य अभिरूची विकसित होण्यास मदत होते यासाठी ८१% शिक्षकांनी सहमत, ०६% शिक्षकांनी असहमत तर १३% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे.

यावरून असे सांगता येईल की, अधिकतर शिक्षकांच्यामते, नाटयीकरण पद्धतीच्या अवलंब केल्यामुळे विद्यार्थ्यांची साहित्यविषयक अभिरूची विकसित होण्यास मदत होते.





**०५. नाटयीकरण पद्धतीपेक्षा दैनंदिन जीवनात वापरण्यात येणारी पारंपारीक अध्यापन पद्धतीच अधिक प्रभावी असते.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ४५ | ३० | १५ |
| ५०% | ३३% | १७% |

**निष्कर्ष:** नाटयीकरण पद्धतीपेक्षा दैनंदिन जीवनात वापरण्यात येणारी पारंपारीक अध्यापन पद्धतीच अधिक प्रभावी असते यासाठी ५०% शिक्षकांनी सहमत, ३३% शिक्षकांनी असहमत तर १७% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे.

यावरून असे म्हणता येईल की, पारंपारिक पद्धतीला आजही अधिकतर शिक्षक अध्यापनासाठी महत्त्वपूर्ण मानतात.





**०६. अधारप्रणाली (रंगमच, पोषाक व साहित्य) सहज उपलब्ध होत नसल्यामुळे शिक्षक नाटयीकरण पद्धतीकडे दुर्लक्ष करतात.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ३६ | ४२ | १२ |
| ४०% | ४७% | १३% |

**निष्कर्ष:** अधारप्रणाली (रंगमच, पोषाक व साहित्य) सहज उपलब्ध होत नसल्यामुळे शिक्षक नाटयीकरण पद्धतीकडे दुर्लक्ष करतात. यासाठी ४०% शिक्षकांनी सहमत, ४७% शिक्षकांनी असहमत तर १३% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे.

यावरून असे म्हणता येईल की, अधिकतरशिक्षकांच्यामते, आवश्यक साहित्य उपलब्ध होत नाही त्यामुळे नाटयीकरण पद्धतीकडे शिक्षक दुर्लक्ष करतात असे नाही.




Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

**०७. भाषा विषयांपेक्षा इतिहास या विषयाच्या अध्यापनासाठी नाटयीकरण पद्धती अधिक उपयुक्त आहे.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| २९ | ४७ | १४ |
| ३२% | ५२% | १६% |


**निष्कर्ष: भाषा विषयांपेक्षा इतिहास या विषयाच्या अध्यापनासाठी नाटयीकरण पद्धती अधिक उपयुक्त आहे.** यासाठी ३२% शिक्षकांनी सहमत, ५२% शिक्षकांनी असहमत तर १६% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे.
यावरून असे म्हणता येईल की, अधिकतरशिक्षकांच्यामते, भाषा व इतिहास या दोन्हीविषयासाठी नाटयीकरण पद्धती ही उपयुक्त ठरते.




**०८. नाटयीकरण पद्धतीमुळे शाळेतील वेळापत्रक आणि नियोजीत कार्यक्रम यात गोंधळ निर्माण होतो.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| २३ | ५२ | १५ |
| २५% | ५८% | १७% |


**निष्कर्ष: नाटयीकरण पद्धतीमुळे शाळेतील वेळापत्रक आणि नियोजीत कार्यक्रम यात गोंधळ निर्माण होतो.** यासाठी २५% शिक्षकांनी सहमत, ५८% शिक्षकांनी असहमत तर १७% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे.
यावरून असे म्हणता येईल की, अधिकतरशिक्षकांच्यामते, नाटयीकरण पद्धतीमुळे शाळेतील वेळापत्रक व नियोजीत कार्यक्रमात कोणताही गोंधळ होत नाही.




**०९. नाटयीकरण पद्धतीमुळे वर्गातील अध्ययन अध्यापनातील सर्वच उद्दिष्टे पूर्ण होतात असे नाही.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ५९ | २३ | ०८ |
| ६५% | २६% | ०९% |

**निष्कर्ष:** नाटयीकरण पद्धतीमुळे वर्गातील अध्ययन अध्यापनातील सर्वच उद्दिष्टे पूर्ण होतात असे नाही. यासाठी ६५% शिक्षकांनी सहमत, २६% शिक्षकांनी असहमत तर ०९% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे. यावरून असे म्हणता येईल की, अधिकतर शिक्षक हे नाटयीकरण पद्धतीमुळे वर्गातील अध्ययन अध्यापनातील सर्वच उद्दिष्टे पूर्ण होतात असे नाही याबाबतीत सहमत आहेत.




International Innovative Journal Impact Factor (IIJIF) Impact Factor : 2.521 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – V, Issue – IV December 2016

**१०. नाटयीकरणातील सहभागामुळे विद्यार्थ्यांना स्व:विषयक व इतरांविषयी ज्ञान आत्मसात करण्यास मदत होते.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ७६ | ०८ | ०६ |
| ८४% | ०९% | ०७% |


**निष्कर्ष:** नाटयीकरणातील सहभागामुळे विद्यार्थ्यांना स्व: विषयक व इतरांविषयी ज्ञान आत्मसात करण्यास मदत होते. यासाठी ८४% शिक्षकांनी सहमत, ०९% शिक्षकांनी असहमत तर ०७% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे. यावरून असे म्हणता येईल की, अधिकतर शिक्षकांच्या मते. नाटयीकरणातील सहभागामुळे विद्यार्थ्यांना स्व विषयक व इतरांविषयी ज्ञान आत्मसात करण्यास मदत होते.




**११. विद्यार्थी आपल्या भूमिका सर्रासपणे करू न शकल्यास नाटयीकरण पद्धतीचा प्रभाव कमी होतो.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ५९ | २१ | १० |
| ६६% | २३% | ११% |


**निष्कर्ष:** विद्यार्थी आपल्या भूमिका सर्रासपणे करू न शकल्यास नाटयीकरण पद्धतीचा प्रभाव कमी होतो. यासाठी ६६% शिक्षकांनी सहमत, २३% शिक्षकांनी असहमत तर ११% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे. यावरून असे म्हणता येईल की, अधिकतर शिक्षकांच्या मते. नाटयीकरण पद्धतीत विद्यार्थी आपल्या भूमिका सर्रासपणे करू न शकल्यास पद्धतीचा प्रभाव कमी होतो.




**१२. नाटयीकरण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा वाचन, भाषण व श्रवण हया क्षमतांचा प्रभावी विकास होण्यास मदत होते.**

| सहमत | असहमत | सांगता येत नाही |
|---|---|---|
| ६३ | १९ | ०८ |
| ७०% | २१% | ०९% |

**निष्कर्ष:** नाटयीकरण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा वाचन, भाषण व श्रवण हया क्षमतांचा प्रभावी विकास होण्यास मदत होते यासाठी ७०% शिक्षकांनी सहमत, २१% शिक्षकांनी असहमत तर ०९% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविलेले आहे. यावरून असे म्हणता येईल की, अधिकतर शिक्षकांच्या मते. नाटयीकरण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा वाचन, भाषण व श्रवण हया क्षमतांचा प्रभावी विकास होण्यास मदत होते.



**चर्चा**

अध्यापनात विविध अध्यापन पद्धती, तंत्रे, प्रतिमाने यांचा उपयोग केल्यानंतर अध्ययन कार्य सहज होत जाते. आता नवीन तंत्रविज्ञान आल्यामुळे आणखी अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ बनली आहे. केवळ पारंपारिक अध्यापन पद्धतीने शिकविणे हे आजच्या अद्ययावत ज्ञान असलेल्या मुलांना कंटाळवाणी वाटत असल्यामुळे शिक्षकांनी आपल्या दैनंदिन कार्यातून वेळ काढून आवश्यक त्या आशय घटकांसाठी नव नवीन अध्यापन पद्धती, तंत्रविज्ञानाचा उपयोग अध्यापना केला पाहिजे. वरील निष्कर्षाचा आढावा घेतला तर लक्षात येते की, नाटयीकरण पद्धतीच्या अवलंबासाठी शिक्षक तयार आहेत परंतु काळीवेळेस उपलब्ध साधन सामग्री, वेळ यामुळे ती पद्धती अवलंब करण्यासाठी शिक्षक मागे पुढे करीत असतात. शैक्षणिक उद्दिष्टांचा विचार केला तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी नाटयीकरण पद्धती उपयुक्त आहे. यातुन विद्यार्थ्यांचा श्रवण, भाषण, अभिव्यक्ती, विचारकरण्याची क्षमता, स्वःजाणीव, गटात एकमेकांनी सहकार्याची भावना, सामाजिक बुध्यांक अशा विविध पैलुंचा विकास या पद्धतीच्या अवलंबनातून होत असतो.

**संदर्भसूची**

१. पंडीत, ब.बी. (२००५). *शिक्षणातील संशोधन*. पुणेः नित्य नुतन प्रकाशन.

२. कऱ्हाडे, बी. एम. (१९७४). *शास्त्रीय संशोधन पद्धती.* नागपूरः पिपंळापुरे प्रकाशन.

३. करंदीकर व मंगळुरकर. (२००८). *मराठी आशययुक्त अध्यापन पद्धती.* कोल्हापूरः फडके प्रकाशन.

४. भिंताडे वि. रा. (१९८९) *शैक्षणिक संशोधन पध्दती (प्रथम आवृत्ती).* पुणेः नुतन प्रकाशन.

५. बरकले, रामदास व पिचड, नलिनी. (२०१२). *नाटयीकरण पद्धती (पुस्तिका चौथी).* नाशिकः यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

६. पंडित, ब. बि. आणि मोरे, लता. (२०१०). *शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग.* नागपूरः पिंपळापुरे आणि कं. पब्लिशर्स.

7. Best, J.W. and Khan, K.M. (2002). *Research in Education* (7th Ed) New Delhi: Practice Hall of India.

8. Cattell, R. B (2008). *Psychological Testing*. New Delhi: Srishti Book Distributors.

9. Kothari, C.R. (1990) *Research Methodology, Methods and Techniques*. New Delhi: Wiley Eastern Limited.